ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B 3434. Licence No. 53.

वर्ष १९ — पुणें, बुधवार तारीख ३० सप्टेंबर, १९५३ — अंक १९

## विविध माहिती

**हिंदी वीरांचा सत्कार**—दुसऱ्या महायुद्धांत रशिआला युद्ध-साहित्य पुरविण्यासाठीं उत्तर-रशिआंतील मुरमान्स्क बंदराचा उपयोग केला जाई. ह्या बंदरांत हें साहित्य पोंचवितांना २७ खलाशी कामास आले होते. त्यांच्या थडग्यावर मुरमान्स्क येथील नागरिकांनीं दगड बसविण्याचें ठरविलें आहे. २७ खलाशांपैकीं ७ खलाशी हिंदी आहेत.

**कॅनरा कॉलेजला देणगी**—कुमटा येथील ग्राहकांच्या सहकारी संस्थेला १९५२-५३ सालीं जो फायदा झाला त्यांतून ६५१ रुपये कॅनरा कॉलेजला देणगी' म्हणून देण्यांत आले. त्याशिवाय आणखी ५ संस्थांना संस्थेनें १२५ रुपयांच्या देणग्या जाहीर केल्या आहेत.

**पाटणा येथील कुटुंबनियोजनाची व्यवस्था**—पाटणा आणि बिहारमधील औद्योगिक केंद्रें ह्यांमधून कुटुंबनियोजनाचीं माहिती केंद्रें उघडण्यासाठीं बिहार राज्य सरकारनें रेडक्रॉस सोसायटीला १०,००० रुपयांची मदत देण्याचें ठरविलें आहे.

**बुद्धाच्या चित्रांचा दुरुपयोग थांबविणार**—भगवान बुद्धाच्या चित्रासारखीं पवित्र धार्मिक चित्रें ट्रेडमार्कसाठीं वापरण्यास बंदी करणारा कायदा सीलोनचें सरकार करणार आहे, असें समजतें.

**औद्योगिक वस्तु संग्रहालय**—मुंबईमध्यें एक परिपूर्ण औद्योगिक वस्तु-संग्रहालय काढण्याच्या योजनेस भारतीय सरकारनें मान्यता दिली आहे. संग्रहालयासाठीं वेगळी इमारत बांधण्यांत येणार असून तींत प्रमुख भारतीय उद्योगधंद्यांतील वस्तू ठेवण्यांत येणार आहेत.

**उत्तर-प्रदेशांत तांब्याच्या खाणी**— उत्तर-प्रदेशांतील अल्मोरा जिल्ह्यांत तांब्याच्या खाणी आढळून आल्या आहेत, असें समजतें. परंतु त्या चालू करून तांब्याचें उत्पादन करण्यास लागणारा पैसा राज्य सरकारजवळ नसल्यामुळें हें काम भारतीय सरकारनें हातीं घ्यावें अशी विनंति करण्यांत आली आहे.

**ब्रिटनमधील बेवारसी मुलें**—ब्रिटनमध्यें दरवर्षी सुमारें १,५०० मुलें त्यांच्या मातांनीं सोडून दिलेलीं अशीं आढळून येतात. बहुतेक मुलें इस्पितळांत अगर चर्चमध्यें सोडून दिलीं जातात. अशा बेवारसी मुलांची जोपासना अर्थातच सरकारला करावी लागते.

**भारतीय व्यापारांत सुधारणा**—१९५२ सालच्या पहिल्या सहामाहींत भारताला आपल्या व्यापारांत ८० कोटी रुपयांची प्रतिकूल तफावत सोसावी लागली. पण दुसऱ्या सहामाहींत मात्र चालू व्यवहारांच्या खातीं ४३·४ कोटी रुपयांची अनुकूल तफावत दिसून आली.

**सुसरीच्या कातड्याच्या निर्यातीला बंदी**—भारत सिलोनकडून सुसरींच्या कातड्यांची आयात बरीच करीत असे. परंतु आतां सीलोनच्या सरकारनें कातड्यांच्या निर्यातीला बंदी केली आहे. सुसरीचें कातडें मिळविण्यासाठीं त्यांची शिकार मोठ्या प्रमाणावर होऊं लागल्यामुळें ही बंदी घालण्यांत आली असें समजतें. जंगली प्राण्यांचें जतन करण्यासाठीं एखादा कायदा करण्याचाहि सीलोन सरकारचा विचार आहे.

**केनिआला अमेरिकन भांडवल हवें**—केनिआचे अर्थमंत्री मि. होप जोन्स अमेरिकेचा दौरा करण्यास निघाले आहेत. योग्य त्या सवलती देऊन आर्थिक विकासासाठीं लागणारें भांडवल खाजगी भांडवलदारांपासून मिळविण्याचा प्रयत्न ते करणार आहेत. अमेरिकन भांडवलदारापुढें कोणत्या धंद्यांना भांडवलाची गरज आहे, ह्याची माहिती ते ठेवतील. खाणी, मळे व एंजिनिअरिंग ह्या धंद्यासाठीं केनिआला भांडवलाची गरज आहे.

**मधाच्या उत्पादनासाठीं बक्षिसें**— कर्नाटक भागाच्या ग्रामोद्योग कमिटीनें मधाच्या उत्पादनाला उत्तेजन देण्यासाठीं जिल्हावार व तालुकावार बक्षीसें जाहीर केलीं आहेत. जिल्ह्यांत व तालुक्यांत जास्तींत जास्त मध उत्पन्न करण्याला तीं दिलीं जाणार आहेत. चालू सालीं कुमटा तालुक्यांतील श्री. एस. पी. हेगडे ह्यांनीं एका पोवळ्यापासून १२९ पौंड मध उत्पन्न केला, त्यांना १०० रुपयांचें पहिलें बक्षीस मिळालें.

**१,८०० मैलांचा विलक्षण प्रवास**—पहिलें महायुद्ध सुरू होण्यापूर्वी कांहीं दिवस सिल्व्हिअन डॅरमन नांवाचा एक माणूस पॅरिसहून मास्कोला जाण्यासाठीं निघाला होता. दोन बांबू घेऊन त्यांवर पाय ठेवण्यास खडावा बसवून त्याच्या साह्यानें त्यानें हा प्रवास केला. हा विलक्षण प्रवास करण्यास त्याला ५८ दिवस लागले.

**जपानची पहिली स्त्री-वैमानिक**—मिसेस हिडेका याकोयामा नांवाची जपानी स्त्री वैमानिकाच्या चांचणी परीक्षेंत यशस्वी झाली आहे. ह्या परीक्षेंत पास होणारी ती पहिलीच जपानी स्त्री आहे. ह्या बाईंना तीन मुलें आहेत, व त्यांचे यजमानहि आहेत.

**ब्रिटनच्या उत्पादनांत वाढ**—१९५२ सालामध्यें ब्रिटनमध्यें उत्पादन झालेल्या औद्योगिक मालाची जितकी किंमत झाली त्याच्यापेक्षा ६० कोटी पौंड अधिक किंमतीचा माल १९५३ सालीं तयार होईल असा अंदाज तज्ज्ञांनीं केला आहे. ब्रिटनचे हुजूरपक्षीय अर्थमंत्री मि. बटलर ह्यांनीं उत्पादनाला उत्तेजन देणारें जें अंदाजपत्रक आंखलें त्यामुळें ही प्रगति शक्य झाली असें तज्ज्ञांचें मत आहे.

## मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट

### सहकारी ज्युबिली निबंधस्पर्धा योजना

भारतांत सहकारी चळवळीस २५ मार्च, १९०४ रोजीं प्रारंभ झाला. मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूट ह्या चळवळीचा सुवर्ण-महोत्सव २५ मार्च, १९५४ रोजीं व त्यानंतरच्या दोन दिवशीं साजरा करणार आहे. त्या उत्सवाचा एक भाग म्हणून, इन्स्टिट्यूटनें बक्षिसासाठी निबंध मागविण्याचें ठरविलें आहे. १८ वर्षांवरील कोणासहि ह्या निबंध-स्पर्धेत भाग घेतां येईल. स्पर्धेची योजना खालीं दिली आहेः—

विषय :– "को-ऑपरेटिव्ह कॉमनवेल्थ" हें ध्येय भारतास उचित आहे काय? असल्यास, तें गाठण्यासाठी कोणत्या मार्गानें गेलें पाहिजे? (Is a Co-operative Commonwealth a worthy ideal for India? If so, what steps are necessary to achieve it?)"

भाषा :– इंग्रजी, मराठी, गुजराती किंवा कन्नड

निबंधाची लांबी :– सुमारें १०,००० शब्द.

बक्षिस :– प्रत्येक भाषेंतील पहिल्या निबंधास प्रत्येकीं २०० रु. बक्षीस दिलें जाईल. इन्स्टिटयूटचा निर्णय अखेरचा बंधनकारक राहील.

निबंधाचा तपशील :—एक चतुर्थांश समास सोडलेल्या कागदावर निबंध शाईनें सुवाच्य लिहावा किंवा डबल स्पेसिंग ठेवून टाईप करावा. निबंधावर लेखकानें स्वतःचें नांव लिहूं नये, पण टोपणनांव धारण करावें. अशा टोपण नांवाखालील निबंध एका पाकिटांत घालावा; पाकिटावर फक्त टोपण नांव व निबंधाची भाषा ह्यांचा उल्लेख करावा.

निबंध आंत घातलेलें पाकीट व त्यासोबत नमुन्याप्रमाणें पत्र अशीं दुसऱ्या एका पाकिटांत घालून त्यावर "सहकारी ज्युबिली स्पर्धेचा निबंध" असें ठळकपणें लिहावें व तें पाकीट ऑनररी सेक्रेटरी, मुंबई प्रां. स. इन्स्टिटयूट ९, बेकहाऊस लेन, कोट, मुंबई १, ह्या पत्त्यावर पाठवावें.

निबंध पोंचण्याची तारीख :– १५ जानेवारी १९५४ रोजीं संध्याकाळीं ६ किंवा त्यापूर्वी निबंध इन्स्टिट्यूटच्या कचेरींत पोचला पाहिजे.

वा. पुं. वर्दे
ऑनररी सेक्रेटरी

---

**निबंधाच्या पाकिटासोबत दुसऱ्या पाकिटांत घालावयाच्या पत्राचा नमुना**

ऑ. सेक्रेटरी
मुं. प्रां. स. इन्स्टिटयूट,
मुंबई

विषयः—सहकारी ज्युबिली स्पर्धेचा निबंध

सा. न. वि. वि.

वरील स्पर्धेसाठी मी इंग्रजी / मराठी / गुजराती / कन्नड भाषेंत .............. ह्या टोपण नांवाखाली निबंध पाठवीत आहे. हा निबंध मी स्वतः लिहिला आहे व स्पर्धेसाठीं आवश्यक त्या वयाच्या अटीप्रमाणें माझें वय आहे.

आपला
..........................
(सही)

सोबतः—निबंध असलेलें पाकीट — सबंध नांव ..........................
सबंध पत्ता ..........................


# दि सांगली बँक लिमिटेड

## सांगली

(स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक)

### मुख्य ऑफिस : सांगली

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व व फंडस् | रुपये ४,९०,००० |
| वर्किंग फंडस् | रुपये एक कोटीवर |

: शाखा :

मुंबई, शहापूर, तेरदळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज, इचलकरंजी.

सांगली येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. आर. व्ही. देशमुख, B. A., B. Litt. (Oxon) (चेअरमन) कलेक्टर, साउथ सातारा.

(१) श्री. नेमचंद रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा बाबाजी आरवाडे, (५) श्री. तात्यासाहेब श्रीमंधर आरवाडे, (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.

एम्. के. गुप्ते,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर

# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

**दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक**

शाखा:—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्लें, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. १,९०,००० |
| ठेवी | रु. ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ९२,९३,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्यें अद्ययावत पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट १० एप्रिल, १९५३ पासून सुरू झाला.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.
ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.
एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. ३० सप्टेंबर १९५३





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## बँकर्सचा पुण्यांतील मेळावा

पूना बँकिंग असोसिएशनचे वतीनें गेल्या नोव्हेंबरमध्यें एक बँकिंग प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें व त्यास जोडून एक व्याख्यानमाला गुंफण्यांत आली होती. त्याचप्रमाणें, बँका : काल, आज व उद्यां हें पुस्तकहि प्रकाशित करण्यांत आलें होतें. त्याच्या अनुषंगानें, बँकिंगच्या व्यवसायांतील अडचणींवर चर्चाहि घडवून आणण्यांत आली होती. ह्या सर्व उपक्रमाचें बँकिंग क्षेत्रांत अत्यंत उत्साहानें स्वागत करण्यांत आलें व रिझर्व्ह बँकेच्या अत्युच्च अधिकाऱ्यांपासून लहान बँकेंतील नोकरांपर्यंत, सर्वांनींच त्याचें कौतुक केलें. असोसिएशनचा उद्देश बँकिंग क्षेत्रांतील मंडळी एकत्र आणणें व त्यांच्या सलोख्यांतून बँकिंगच्या प्रगतीस पोषक वातावरण निर्माण करणें, त्याचप्रमाणें समाजाला बँकांच्या उपयुक्त व्यवहाराची माहिती देणें, हा आहे. ह्या उद्देशाच्या सिद्धीसाठीं, असोसिएशननें गेल्या वर्षाच्या यशावरच संतुष्ट न रहातां, चालू वर्षींहि कार्यक्रम आखून पार पाडले.


"बँकर्स ॲन्युअल नंबर, १९५३" ह्या इंग्रजी भाषेंतील बँकिंग वार्षिकाचा प्रकाशन समारंभ दि. १९ सप्टेंबर १९५३ रोजीं श्री. बी. टी. ठाकूर, जनरल मॅनेजर, युनायटेड कमर्शिअल बँक लि., कलकत्ता ह्यांचे हस्तें थाटानें पार पडला. प्रस्तुत पुस्तकांत भारताच्या वेगवेगळया ठिकाणच्या कांहीं नामवंत व अनुभवी बँकर्सचे व तज्ज्ञांचे लेख देण्यांत आले आहेत. त्यावरून हिंदी बँकिंगच्या सद्यःस्थितीवर व प्रगतीच्या दिशेवर उत्कृष्ट प्रकाश पडतो. पूना बँकिंग असोसिएशनच्या ह्या वार्षिकास त्यामुळें अखिल भारतीय बँकिंग क्षेत्रांत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. इंडियन बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष, शेठ प्राणलाल देवकरण नानजी, ह्यांनीं पुस्तकास प्रस्तावना लिहून त्यांतील लेखांची उपयुक्तता दाखवून दिली आहे, इतकेंच नव्हे तर स्वतःच्या बँकेसाठीं त्यांनीं पुस्तकाच्या १०० प्रती राखून ठेवल्या आहेत.

पुस्तकांतील सर्व लेखांचा परामर्श येथें घेतां येणें शक्य नाहीं. परंतु, श्री. बी. टी. ठाकूर (भारतांतील पहिल्या पांच बड्या संस्थांपैकीं एकीचे प्रमुख) ह्यांच्या लेखाचा उल्लेख करणें आवश्यक आहे. त्यांच्या भाषणांतहि त्यांनीं पुस्तकामधील लेखांतील मुद्यांचा विस्तार केला होता. त्यांचें म्हणणें असें, कीं उत्पादनवाढ झाल्याविना लोकांच्या रहाणीचा दर्जा सुधारणें अशक्य आहे, आणि हें उत्पादन पुरेसें, यांत्रिक पद्धतीनें व कार्यक्षमतेनें झालें पाहिजे. उत्पन्न वाढविण्याकडे जितकें लोकांचें लक्ष असावयास पाहिजे तितकें तें नाहीं; उलट अपुऱ्या उत्पन्नांत प्रत्येकजण वाटा मात्र ज्यास्त ज्यास्त मागूं लागला आहे व अशा मागण्यांची निकड आर्थिक गाड्यास खीळ घालूं लागली आहे. राष्ट्रीय उत्पन्नास आपण हातभार किती लावतों व आपलें कर्तव्य आपण पार पाडतों किंवा नाहीं, ह्याचा कोणीच विचार करीत नाहीं; उलट स्वतःच्या कामगिरीच्या अप्रमाण अशा मोबदल्याची मात्र जो तो हक्कानें व संघटित रीत्या मागणी करूं लागला आहे. बँकर्सना आर्थिक संसारांत अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे आणि त्यांनीं तें ओळखून योग्य त्याच योजनांस पाठिंबा दिला पाहिजे व अनिष्ट गोष्टींपासून समाजाचें संरक्षण केलें पाहिजे. इतरांपेक्षां बँकर्सना आर्थिक घडामोडींचा आवांका अधिक लवकर आला पाहिजे व त्यांनीं त्यास अनुसरून सरकारी धोरणांस कलाटणी दिली पाहिजे. बँकर्सना हें स्थान प्राप्त होतें, तें त्यांच्या विशिष्ट भूमिकेमुळें, त्याचप्रमाणें त्यांच्या विशिष्ट अनुभवामुळें व तज्ज्ञ आकलनक्षमतेमुळें म्हणून, बँकर्सनीं ज्ञानी बनलें पाहिजे व इतरांचें अज्ञान त्यांनीं दूर केलें पाहिजे. उद्योगधंदे व बँकिंग ह्यांच्या निकटच्या संबंधावर शेठ प्राणलाल ह्यांनींहि आपल्या लेखांत भर दिला आहे.


दि. १९ रोजीं दुपारीं, चहापानाचे वेळीं, कॅनरा बँकेचे जनरल मॅनेजर श्री. पी. एस. नायक ह्यांच्या अध्यक्षतेखालीं बँकिंगविषयक प्रश्नांची उद्बोधक चर्चा झाली. त्यांत श्री. ठाकूर, श्री. फ्रीमन, श्री. जोग, श्री. सराफ, श्री. चितळे, इत्यादींनीं भाग घेतला. श्री. ठाकूर, ह्यांनीं बहुतेक प्रश्नांवर आपल्या अनुभवावर व व्यापक ज्ञानावर आधारलेलीं अशीं उत्तरें दिलीं, तीं मार्गदर्शक अशीच होतीं. दि. २० रोजीं सकाळीं श्री. फ्रीमन (कॅनरा बँक लि. च्या फॉरिन खात्याचे प्रमुख) ह्यांनीं 'शिपिंग व बँकिंग' या विषयावर अत्यंत माहितीपूर्ण असें व्याख्यान दिलें. फॉरिनचा व्यवहार आपल्या इकडे अपरिचित असाच आहे; परंतु तो किती व्यापाचा व मोठ्या भांडवलाचा, त्याचप्रमाणें कुशल कारभाराचा आहे, ह्याची कल्पना त्यांचे व्याख्यानावरून आली. त्या वेळीं श्री. ठाकूर ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. त्यांनीं आपल्या समारोपाच्या भाषणांत परराष्ट्रीय व्यवहारांतील अडीअडचणी सांगितल्या व योग्य त्या सूचनाहि केल्या. अशा तऱ्हेनें पूना बँकिंग असोसिएशनचा कार्यक्रम संपला.

प्रस्तुत समारंभाच्या व व्याख्यानांच्या निमित्तानें जमलेल्या बँकर्सना "आपण नवीन कांहीं तरी शिकलों; आपली दृष्टि थोडी तरी विशाल झाली" असेंच वाटलें असलें पाहिजे. श्री. फ्रीमन हे लॉइड्स बँकेच्या फॉरिन खात्याचे सेवानिवृत्त अधिकारी; पहिल्या महायुद्धांत जखमी होऊन त्यांचा डावा हात अजीबात गेलेला; दुसऱ्या महायुद्धांत तर त्यांचा मुलगा अजीबातच गेलेला; तरी सुद्धां वयाच्या ६०-६२ व्या वर्षीं कॅनरा बँकेचें फॉरिन खातें लावून देण्यासाठीं ते त्या बँकेंत काम करीत आहेत आणि त्यांच्या हिंदी सहकाऱ्यांशीं एकरूप झालेले आहेत. श्री. ठाकूर हे पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांतून एम. ए. झालेले एक गृहस्थ. युनायटेड कमर्शिअल बँकेला जागतिक स्थान देण्याच्या उमेदीनें वयाच्या साठीनंतरहि, अविरत प्रयत्न करीत आहेत. पूना बँकिंग असोसिएशनच्या उपक्रमांचें अधिकाधिक चीज होईल व त्यांतून आपल्या बँकर्सना व बँकिंगशीं हितसंबंध असणारांना इष्ट मार्गदर्शन होईल अशी अपेक्षा आहे. श्री. ठाकूर ह्यांनीं असोसिएशनला २०० रुपयांची देणगी पाठवून, असोसिएशनच्या कार्याचा गौरव केला आहे.

## ★ समारंभाचीं कांहीं दृश्यें ★




**श्री. बी. टी. ठाकूर**
जनरल मॅनेजर, युनायटेड कमर्शिअल बँक हे " बँकर्स अॅन्युअल " चें प्रकाशन जाहीर करीत आहेत. त्यांचें " नव्या परिस्थितींत बँकरची महत्त्वाची भूमिका " ह्या विषयावर भाषण झालें.



पूना बँकिंग असोसिएशनचे कांहीं सभासद
( पाहुण्यांसमवेत )



**श्री. डी. फ्रीमन**
लॉइड्स बँकेचे सेवानिवृत्त फॉरिन शाखा अधिकारी व आतां कॅनरा बँकेचे फॉरिन शाखा प्रमुख "शिपिंग व बँकिंग" ह्या विषयावर भाषण करीत आहेत.



श्री. पी. एस. नायक, कॅनरा बँकेचे जनरल मॅनेजर, चर्चेचे अध्यक्ष
( समारोप करतांना )



**श्री. धों. कृ. साठे**
चेअरमन, बँक ऑफ महाराष्ट्र, हे स्वागतपर भाषण करीत आहेत.



चहापानाचे वेळीं चर्चा चालू आहे.

★ समारंभाचीं कांहीं दृश्यें ★



श्री. नि. ना. क्षीरसागर
( संदेश वाचतांना )




श्री. डी. एन. गांडेकर
( अहवाल वाचतांना )



श्री. चिं. वि. जोग
( आभार मानतांना )



श्री. श्री. वा. काळे
( संपादक " बँकर्स ॲन्युअल " )



श्री. गांडेकर, श्री. पुरोहित व श्री. जोग
( कार्यकारी मंडळ, पूना बँकिंग असोसिएशन )

" *The Volume deserves to be on the table of every Bank Office* "

**BANKERS' ANNUAL NUMBER, 1953.**

*Editor*
**S. V. Kale**
*Editor "Artha"*

*Publisher*
***Poona Banking Association***
*261, Budhwar, Poona 2.*

Pages 112

***Price Rs. 2-8-0***

***ARTICLES***
***by***

Shri. **B. T. Thakur**, United Commercial Bank Ltd.
Seth **Pranlal D. Nanjee**, President, Indian Banks Association.
Shri. **D. S. Savkar**, Reserve Bank of India.
Shri. **D. Freeman**, Canara Bank Ltd.
Shri. **K. P. Mathew**, Trav. Cochin Banking Association,
and many others

***FOREWORD by Seth Pranlal D. Nanjee***
ALSO
*Novel Features, Pictures and Modern Ideas.*

## ★ बँकर्स ॲन्युअल मधील काहीं लेखक ★



शेठ प्राणलाल दे. नानजी


श्री· बी· टी· ठाकूर


श्री· डी. एस· सावकार


डॉ. एस. जी· पाणंदीकर


श्री· डी· फ्रीमन



सरदार मोहनसिंग


डॉ. टी· एम. ए. पै


श्री. डी. डी. देशपांडे


श्री· बी· व्ही· नारायण रेड्डी


श्री· चिं. वि. जोग


श्री· के· पी· मॅथ्यू


श्री· जी· व्ही· सराफ

## समाजविकास-योजनांची प्रगति

### पहिल्या नऊ महिन्यांतील कार्याचा आढावा

समाज–विकास–योजनांच्या कार्यास आरंभ झाल्यापासून पहिल्या नऊ महिन्यांतील ( ऑक्टोबर, १९५२ ते जून, १९५३ ) प्रगतीच्या तपशिलावरून पाहतां २ ऑक्टोबर, १९५२ रोजीं कार्यास प्रारंभ झालेल्या ८१ विकास गटांत पुनर्विलोकनाच्या या मुदतींत सरकारी खर्च ११६·७९ लाख रुपयांचा असून, लोकांच्या मदतीचा आंकडा १०८·६२ लाख रुपये आहे. त्यांपैकी ४८·३६ लाख रुपये श्रमदानांच्या रूपानें व रोकड आणि इतर देणग्या–उदाहरणार्थ जमीन––मिळून ६०·१६ लाख रुपये आहेत.

या मुदतींपैकी पहिल्या सहा महिन्यांपेक्षां शेवटच्या तीन महिन्यांत प्रत्यक्ष कामाचे बाबतींत अधिक प्रगति झाली असें उपलब्ध तपशिलावरून दिसून येतें. कदाचित त्या सहा महिन्यांच्या सुरवातीच्या काळाचा प्राथमिक कामें, पाहणी, समाज–विकास कार्यक्रमांतील आपल्या भूमिकेविषयीं लोकांत जागृति निर्माण करणें, नोकरवर्गाचें शिक्षण, इत्यादी गोष्टींसाठीं उपयोग करण्यांत आल्यामुळें असें घडलें असावें. पुढील तक्त्यांत ( १ ) पहिल्या सहा महिन्यांतील प्रगति व ( २ ) एकूण नऊ महिन्यांच्या मुदतींत झालेली प्रगति यांचे आंकडे असून त्यावरून झालेली प्रमुख कामें व शेवटच्या तीन महिन्यांत त्यांस मिळालेली गती समजूं शकेल.

| कामाचा प्रकार | पहिल्या सहा महिन्यांतील प्रगति (ऑक्टोबर १९५२ ते मार्च १९५३ | नऊ महिन्यांतील प्रगति ( ऑक्टोबर १९५२ ते जून १९५३ ) |
|---|---|---|
| १. कंपोस्ट खड्डे खोदले | ४३,७६१ | ८०,०९१ |
| २. रासायनिक खतें वाटलीं | ६०,१३५ मण | २,८९,८९० मण अधिक ६०,८३३ गोण्या |
| ३. प्रात्यक्षिक शेतकी केंद्रें चालू केलीं | ८२ | ४३४ |
| ४. फळांच्या लागवडीखालीं आणलेली जमीन | ६,१७७ एकर | ६,४७८ एकर |
| ५. भाजीपाल्यांच्या लागवडीखालीं आणलेली जमीन | ३,५५३ ,, | ६,३३७ ,, |
| ६. पडिक जमिनीची लागवड | २१,०५७ ,, | ३५,४३७ ,, |
| ७. पाटाखालीं आणलेली जमीन | २४,७७६ ,, | ६८,९८७ ,, |
| ८. गुरांची निपज व कृत्रिम रेतन पद्धतीचीं चालू केलेलीं केंद्रें | ९२ आणि ४ निवडक ग्रामकेंद्रें | १४१ आणि ४ निवडक ग्रामकेंद्रें |
| ९. लस टोंचलेल्या गुरांची संख्या | ४,०३,३५८ | ६,२८,९७१ |
| १०. सांडपाणी मुरण्याचे खड्डे | ११,१८२ | १३,६९८ |
| ११. बांधलेलीं गटारें | ४१,०२३ यार्ड | ५८,१४६ यार्ड |
| १२. नव्या विहिरी | २०७ | ७६४ |
| १३. जुन्या विहिरींची दुरुस्ती | ३८१ | ९८८ |
| १४. मूलोद्योग प्रकारांत रुपान्तर केलेल्या शाळा | ७० | २०९ |
| १५. नवीन शाळा | ४८४ | १०८६ |
| १६. सुरू केलेलीं प्रौढ शिक्षण केंद्रें | १,४२६ | २,३५३ |
| १७ प्रौढ विद्यार्थ्यांची संख्या | १७,७१८ | ३०,२८५ |
| १८. पक्के रस्ते तयार केले | ६६ मैल | ९५ ५/८ मैल |
| १९. कच्चे रस्ते | १६३२–३/४ मैल | २१३३ ५/६ मैल व ३ पूल |
| २०. कला व हस्तव्यवसायांत मिळालेल्या अधिक नोकऱ्या व देखरेखनिसांची संख्या | ४६३ | ८११ |
| २१. शिक्षित ग्रामसेवकांची संख्या | ५८० | १,७५३ |
| २२. खेड्यांत बांधलेलीं घरें | ८४४ | ९८५ |

## औद्योगिक सोसायटयांच्या सेक्रेटरींसाठीं ट्रेनिंग क्लास–उद्घाटन समारंभ

पुणें जिल्हा सहकारी बोर्डामार्फत पुणें जिल्ह्यांतील औद्योगिक सोसायट्यांच्या अनट्रेन्ड सेक्रेटरींसाठीं ट्रेनिंग क्लास ता. १८।९।५३ रोजीं सुरू झाला. सदर क्लासचें उद्घाटन शुक्रवार ता. १८।९।५३ रोजीं दुपारीं २ वाजतां बोर्डाचे ऑफिसांत श्री. ग. म. नलावडे, मेयर, पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन, यांचे अध्यक्षतेखालीं झालें. समारंभास अधिकारीवर्ग, नॉन-ऑफिशिअल्स व सेक्रेटरी मिळून ६०।७० मंडळी हजर होती. इन्स्टिट्यूटचे एक्झिक्यूटिव्ह ऑफिसरसाहेब मे. शहा हे खास निमंत्रणावरून हजर होते. सुरवातीस बोर्डाचे चेअरमन श्री. जे. टी. सावंत यांचें प्रास्तविक भाषण झाल्यावर को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर मे. देशपांडे यांनीं क्लासबद्दल माहिती सांगितली. त्यानंतर श्री. डी. जे. शहा, एक्झिक्युटिव्ह ऑफिसर व श्री. मा. वि. मद्राने, सुपरिंटेंडेंट, महाराष्ट्र सहकारी विद्यालय पुणें यांची क्लासच्या उपयुक्ततेबद्दल व इन्स्टिट्यूटच्या कार्याबद्दल भाषणें झालीं. श्री. एन्. एन्. कराडकर, डी. सी. ओ. पुणें व श्री. करंदीकर वकील, पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे डायरेक्टर यांचीही माहितीवजा भाषणें झालीं. त्यानंतर अध्यक्षांचें सेक्रेटरीजना उद्देशून भाषण झालें व त्यांनीं वर्गाचें उद्घाटन केल्याचें जाहीर केलें. श्री. रा. ह. तुपे, बोर्ड मेंबर यांनीं अध्यक्षांचे, जमलेल्या निमंत्रित मंडळींचे व अधिकारी वर्गाचे आभार मानले व हारतुरे होऊन हा समारंभ संपला.

हात–कागदाची खरेदी—भारतीय सरकारनें आपल्या विविध खात्यांसाठीं १९५१–५२ ह्या सालीं ९०,००० रुपये किंमतीचा हातानें तयार केलेला कागद विकत घेतला असें कळतें.

दि
बँक ऑफ महाराष्ट्र लि.
स्थापना १९३१
—भांडवल—
वसूल झालेलें भांडवल :: रु. १६,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड :: रु. ६,१६,०००
एकूण खेळतें भांडवल :: रु. २,५०,००,०००
संचालक मंडळ
श्री. धों. कृ. साठे (अध्यक्ष) श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष)
श्री. न. ग. पवार श्री. मा. रा. जोशी
श्री. फ. दो. पदमजी श्री. मा. वी. शहा
श्री. शं. ल. किर्लोस्कर श्री. मा. म. गुते
आपल्या मौल्यवान चीजवस्तू बँकेच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टसमध्यें ठेवा.
मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.
चिं. वि. जोग, मॅनेजर.

## भारतास मिळालेलें परदेशी साह्य

भारतास आतांपर्यंत परदेशांकडून मिळालेल्या आर्थिक साह्यांत पुढील साह्याचा अंतर्भाव आहे:- ( १ ) २० लक्ष टन गव्हाचा पुरवठा करण्यासाठी अमेरिकेनें दिलेलें सुमारें ९० कोटी रुपयांचें कर्ज ( २ ) जागतिक बँकेकडून मिळालेली एकूण सुमारें ५२ कोटी रुपयांचीं पांच कर्जें ( ३ ) अमेरिकन सरकारकडून मिळालेलें एकूण सुमारें ४२ कोटी रु. चें आर्थिक साह्य आणि ( ४ ) नॉर्वेकडून मिळालेलें सुमारें ६७ लाख रु. चें साह्य.

कोलंबो योजनेसाठीं भारतास १९५२ पर्यंत पुढीलप्रमाणें साह्य मिळालें आहे:—

### ऑस्ट्रेलिया

ऑस्ट्रेलियाची मदत ३० जून, १९५२ ला संपलेल्या वर्षासाठीं ४२ लक्ष पौंड होती. त्यापैकीं ३७ लक्ष पौंड गव्हाचा पुरवठा करण्यासाठीं व ५ लक्ष पौंड विकासयोजनांच्या सामुग्रीसाठीं होते. त्या देशाची ३० जून, १९५३ ला संपलेल्या वर्षाची मदत ३० लक्ष पौंड होती.

### कानडा

३० जून, १९५२ ला संपलेल्या वर्षासाठीं कानडानें १५० लक्ष डॉलरचें साह्य दिलें. त्यांपैकीं १०० लक्ष डॉलर १,१४,००० टन गहूं खरेदी करण्यासाठीं वापरण्यांत आले. उरलेल्या रकमेपैकीं ४५ लक्ष डॉलर बॉम्बे स्टेट ट्रॅन्स्पोर्ट कार्पोरेशनकरतां मोटारी घेण्यासाठीं वापरण्यांत आले. कानडा सरकारची १९५३ मधील मदत १३८ लक्ष डॉलर आहे.

### न्यूझीलंड

न्यूझीलंड सरकारच्या १९५२ मधील मदतीचा वांटा २,५०,००० पौंड आहे. १९५३ सालीं ३,७५,००० पौंड राखून ठेवण्यांत आले आहेत.

दक्षिण आणि आग्नेय आशियांतील देशांच्या ब्रिटनकडे असलेल्या पौंडी गंगाजळींतून त्यांनीं आपल्या आर्थिक विकासासाठीं उचल करावी अशी कोलंबो योजनेंतील सूचना भारत व ब्रिटिश सरकारनें अमलांत आणली आहे. जुलै, १९५३ मध्यें उभय सरकारांत झालेल्या करारानुसार, कोलंबो योजनेच्या मुदती अखेरीस, भारतास परकीय चलनाची पुरेशी शिल्लक राहील इतकीच रकम पौंडी गंगाजळींत शिल्लक ठेवण्यांत येईल. बाकीची रकम प्रामुख्यानें विकासखर्चासाठीं वापरण्यांत येईल.

तांत्रिक साह्याच्या क्षेत्रांत पाहतां भारतास अनेक तज्ज्ञ पुरविण्यांत आले असून, प्रगत देशांत भारतीयांस तांत्रिक शिक्षणाच्या सवलतीहि मिळाल्या आहेत.

---

### दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव

या बँकेची सोमवार दिनांक २१ माहे सप्टेंबर सन १९५३ इ. रोजीं वार्षिक सर्वसाधारण सभा होऊन पुढील वर्षाकरितां ( इ. स. १९५३–५४ सालाकरितां ) खालील प्रमाणें बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवड करण्यांत आली.

( १ ) श्री. जी. एम्. भातकांडे ( २ ) श्री. जी. एच. देसूरकर ( ३ ) श्री. जी. एम्. दळवी ( ४ ) श्री. बी. बी. सावंत ( ५ ) श्री. ए. जी. घोरपडे ( ६ ) श्री. जी एस. भातखंडे ( ७ ) श्री. के. एम्. खनूकर, बी. ए., एल्.एल्. बी. ( ८ ) श्री. के. आय. भातकांडे ( ९ ) श्री. एस्. एफ्. कामुळे

### भारतांतील रेडिओचे परवाने

—३१ डिसेंबर अखेर—

| | १९५० | १९५१ | १९५२ |
|---|---|---|---|
| घरगुती वापरासाठीं | ५,०७,३२४ | ६,३५,०२६ | ६,९४,५६० |
| व्यापारी | २६,७२६ | २७,२१७ | ३४,०२६ |
| विक्रीचे रेडिओ ठेवण्यासाठीं | ६,५५९ | ६,६२२ | ७,३४१ |
| प्रात्यक्षिकासाठीं | २,३४८ | १,८३६ | २,०३९ |
| सामूहिक | ३,३६२ | ५,००० | ६,६१३ |
| शालेय | | २,३८२ | २,९७२ |
| अंध संस्थांतील | | ४९ | २६ |
| क्रिस्टल ( हेडफोन्स लावून ऐकावयाचे ) | | ७,३७६ | ११,०४३ |
| | ५,४६,३१९ | ६,८५,५०८ | ७,५८,६२० |

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.


आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

किर्लोस्कर

पॉवरवर चालणारे





वसंत नं. ३ चरक

" शरद चरक "

उसाचे चरक

हंगाम नजीक आला !

—सविस्तर माहितीसाठीं आजच लिहा.—

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी (जि. द. सातारा)

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.